महापारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादीत.

(CIN No. U40109MH2005SGC153646)

कार्यकारी अभियंता,
अति उच्च दाब संवसु विभाग
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादीत.
मिरजोळे रोड,एम.आय.डी.सी.रत्नागिरी ४१५ ६३९
दुरध्वनी क्रमांक ०२३५२– २३१३८८ (का.)
फॅक्स नंबर ०२३५२ – २२८००३ (फॅक्स)
E-mail – ee3220@mahatransco.in
Website : www.mahatranco.in

जावक क्रं.काअ/अउदा संवसु विभाग/रत्ना/मासं/ No 01207 दिनांक : 30 AUG 2022

शिकाऊ उमेदवार कायदा, १९६१ अंतर्गत वर्ष २०२१ – २०२२ करीता अउदा संवसु विभाग, रत्नागिरी येथे निवड झालेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी.

१. शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ च्या अंतर्गत या विभागीय कार्यालयाकडुन राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) मान्यता प्राप्त औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमधुन विजतंत्री (Electrician) या व्यवसायातुन उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांकडुन शासनाच्या ऑनलाईन पोर्टलद्वारे अर्ज मागविण्यात आले होते. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक १२.०७.२०२१ पर्यंत होती.

२. त्या अनुषंगाने सक्षम निवड समितीने ऑनलाईन पोर्टलवर उपलब्ध असलेल्या माहितीच्या /कागदपत्रांच्या (जात,गुण इ.) आधारे तयार करण्यात आलेल्या शिकाऊ उमेदवारांच्या तात्पुरत्या निवड यादीस मंजुरी दिली आहे. शिकाऊ उमेदवारांची तात्पुरती निवड यादी त्यांना एसएससी व आयटीआय विजतंत्री (Electrician) मध्ये प्राप्त झालेल्या एकत्रित गुणांच्या सरासरी नुसार तयार करण्यात आलेली आहे. तसेच सदर तात्पुरती निवड यादी मा.अधीक्षक अभियंता, अउदा संवसु मंडल कोल्हापूर यांच्या परवानगीने प्रसिध्द करण्यात येत आहे.

३. ज्या दोन किंवा अधिक शिकाऊ उमेदवारांचे एकुण गुण समान आहेत अशा शिकाऊ उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेवुन त्यांच्यातील जेष्ठ शिकाऊ उमेदवाराची निवड करण्यात आलेली आहे.

४. तात्पुरती निवड झालेया सर्व शिकाऊ उमेदवारांना त्यांची शैक्षणीक अर्हता, वय, जात, उन्नत गटात मोडत नसणे इत्यादी बाबतचे सर्व मुळ प्रमाणपत्र /कागदपत्रे ही पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहिल व सादर करु न शकलेल्या शिकाऊ उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

५. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणुन शिकाऊ उमेदवारासाठी उमेदवाराचा कोणताही हक्क राहणार नाही. ही निवड यादी तात्पुरती स्वरुपात असुन, पूर्णत: शिकाऊ उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, जात प्रवर्ग व इतर अटी व शर्ती पुर्ण करण्याच्या अधीन राहुन आहे. त्यामुळे शिकाऊ उमेदवार म्हणुन निवड होणेसाठी आवश्यक असलेली पुर्वावश्यकता धारण करीत नसल्यास किंवा आवश्यक अटी व शर्तीचा भंग होत असल्यास संबंधीत उमेदवारी/निवड कोणत्याही टप्प्यावर रद् करण्यात येईल.

६. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश असलेला शिकाऊ उमेदवार कागदपत्र पडताळणीत अपात्र आढळुन आल्यास अथवा कागदपत्र पडताळणीसाठी गैरहजर राहिल्यास अथवा कागदत्र पडताळणीमध्ये पात्र असुन देखील व्यवसाय प्रशिक्षणासाठी हजर न झाल्यास प्रतिक्षा यादी कार्यान्वित करण्यात येवुन त्या यादीतील शिकाऊ उमेदवारांची पात्रता व कागदपत्रे पडताळणी करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात यईल. सदर प्रतिक्षा यादीतील शिकाऊ उमेदवार सुध्दा कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र असुन देखील व्यवसाय प्रशिक्षणासाठी हजर न झाल्यास त्या खालील गुणवत्ता धारक शिकाऊ उमेदवाराची स्वतंत्र निवड/प्रतिक्षा यादी लावण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग रत्नागिरी राखुन ठेवत आहेत.

७. तात्पुरत्या निवड यादी तयार करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आली आहे. तथापि, अनावधानाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करुन योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग रत्नागिरी राखुन ठेवत आहेत.

८. निवड न झालेल्या शिकाऊ उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार अउदा संवसु विभाग, रत्नागिरी या कार्यालयाकडे करु नये. शिकाऊ उमेदरांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची या कार्यालयाकडुन दखल घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, रत्नागिरी या विभागात निवड झालेल्या शिकाऊ उमेदवारांची तात्पुरती निवड यादी खालील प्रमाणे.

PROVISONAL SELECT LIST

Sr. No	Application Code	Candidate Name	Caste Category	Remark
1	AP072125685	SHAIKH ISMAIL SALIMABI	OPEN	
2	AP0621275040	BHAGYASHRI DADARAO MUNDHE	OBC	Selected against Open
3	AP072105708	KOMAL RAM BAIRAGI	OBC	Selected against Open
4	AP072126435	GOVIND BAPURAO SHINDE	OPEN	
5	AP072107410	GANESHKAR ARTI BABAN	OPEN	
6	AP072104617	ABHISHEK ARUN MASKE	OPEN	
7	AP0721108744	RAUT DUSHYANT NAMDEV	OBC	Selected against Open
8	AP072159800	VAIBHAV RAMCHANDRA GHORPADE	OBC	Selected against Open
9	AP072114615	SHUBHAM DHANAJI GAIKWAD	OPEN	
10	AP062176919	ANURAG ANANT KADAM	OPEN	
11	AP0621269718	GAIKWAD NIKITA LAXMAN	SC	
12	AP072159499	AKASH BIBHISHAN WANJARE	SC	
13	AP072102757	RISHIKESH BHAGWAT KORDE	SC	
14	AP072124870	ASHOK JAYRAM TAMBUD	ST	
15	AP072148082	SANDHYA ANURATH KATKAR	OBC	
16	AP0721157037	ROHIT SUNIL CHAUDHARI	OBC	
17	AP0621264010	ANANDSING RAJU RAJPUT	OBC	
18	AP0621266070	NAKUL SUBHASH SHERKAR	OBC	
19	AP072122257	AMOL NATHRAO RATHOD	(VJ A)	
20	AP072126280	KRUSHNA MADHAV RAJMORE	(NT B)	
21	AP072150798	NITIN SIDDHAPPA ARJUNE	(NT C)	
22	AP072101511	MUNDE PRALHAD DATTATRYA	(NT D)	

PROVISONAL WAITING LIST

Sr. No	Application Code	Candidate Name	Caste Category	Remark
1	AP0621269842	SHELKE SACHIN RAJENDRA	OPEN	
2	AP072152568	SHUBHANGI MADHAV CHAVAN	OPEN	
3	AP072143448	RUSHIKESH MANAJI ROKADE	OPEN	
4	AP0721106450	TULSHIRAM PANDURANG KORDE	SC	
5	AP072154216	VINOD VASUDEV ZYATE	ST	
6	AP072194694	SHUBHAM LAXMAN BANKAR	OBC	
7	AP072106479	NITIN DAYANAND RATHOD	VJ(A)	
8	AP0621270163	ANIL BHAURAO EKADASHE	(NT B)	
9	AP072145466	KALPANA BIBHISHAN HAJARE	(NT C)	
10	AP0721104867	LAD ALKA KERBA	(NT D)	

९. तात्पुरती निवड यादी (Provisional Select List) मधील उमेदवारांनी **दिनांक १२.०९.२०२२** पर्यंत कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, रत्नागिरी, कांचन हॉटेल शेजारी एम.आय.डि.सी. मिरजोळे, रत्नागिरी पिन कोड नं. ४१५६३९ या पत्यावर कार्यालयीन दिवशी (शनिवार, रविवार वगळुन) **सकाळी १०:००** ते सायंकाळी ६:१५ या कार्यालयीन वेळेत हजर रहावे. **दिनांक १२.०९.२०२२** नंतर कागदपत्र पडताळणीसाठी येणा–या उमेदवारांची निवड रद् करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१०. कागदपत्र पडताळणीच्या वेळी खालील प्रमाणे मुळ कागदपत्रे/ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक असले याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

१. शाळा सोडल्याचा दाखला.
२. आयटीआय विजतंत्री गुणपत्रक (सर्व सत्र) व प्रमाणपत्र (सनद)
३. एसएससी गुणपत्रक/प्रमाणपत्र.
४. राखीव गटातुन उमेदवाराने अर्ज केला असेल तर जात प्रमाणपत्र व असल्यास जातवैधता प्रमाणपत्र
५. उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.
६. आर्थिक दुर्बल घटक उमेदवार मोडत असेल तर चालु अदयावत प्रमाणपत्र.
७. चारित्र पडताळणी प्रमाणपत्र.
८. आधार कार्ड.
९. बॅक पासबुक.

वरील सर्व मुळ कागदपत्रे तसेच सर्व कागदपत्रांचा वरील क्रमाने साक्षांकित प्रतीचा १ संच.

११. कागदपत्रे पडताळणी करीता येणा–या शिकाऊ उमेदवारांना कुठल्याही प्रकारचा प्रवास खर्च किंवा इतर खर्च दिला जाणार नाही. शिकाऊ उमेदवारांना स्वखर्चाने कागदपत्र पडताळणी करीता उपस्थित राहावे लागेल.

(विजयकुमार निकम)
कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.पा.कं.मर्यादित,
अउदा संवसु विभाग, रत्नागिरी.

प्रत सविनय सादर :– अधीक्षक अभियंता, अउदा संवसु मंडल कोल्हापूर.